आर.सी.सी. १२५/२०२२
सरकार वि. नारायण व इतर
**निशाणी ३२**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नाव – किरण भाऊसाहेब गुंजाळ, | वय – २९ वर्षे, |
| व्यवसाय – शेती, | राहणार – गुंजाळवाडी, |
| तालुका – संगमनेर, | जिल्हा – अहमदनगर. |

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. घटना अंदाजे अडीच वर्षापुर्वी दुपारी ०२:०० ते ०२:३० वाजणेच्या सुमारास धामणगाव पाट येथे घडली होती. त्यावेळी आमच्यामध्ये व आरोपींमध्ये जमिनीच्या कारणावरून किरकोळ बाचाबाची झाली होती. या व्यतिरीक्त काही घडले नव्हते. रागाच्या भरात मी आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती. फिर्यादीमध्ये मी उपरोक्त मजकुराव्यतिरीक्त काही सांगितले नव्हते. आता मला अभिलेखावरील माझी फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस अनुक्रमे **निशाणी ३३ व ३४** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५.०५.२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजता मी धामणगाव पाट येथे होतो. हे म्हणणे खरे नाही की,

**निशाणी ३२**

माझी आत्या सुनिता चौधरी यांना घरकुल मंजूर झाले होते व आरोपी हे घरकुल बांधण्यास हरकत करत असताना मी त्यांना समजावून सांगत होतो की, आत्या यांना घरकुल बांधू द्या. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा आरोपींना राग आला व आरोपी म्हणाले की, आम्ही आमच्या जागेत घरकुल बांधू देणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, किशोर याने त्याचे हातातील गजाने माझ्या डोक्यात मारले. हे म्हणणे खरे नाही की, किशोर याची पत्नी प्रियंका हीने हातात दगड घेवून मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे मामा सतिष चौधरी व आते भाऊ सार्थक चौधरी मला सोडवण्याकरीता आले असता आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला आलो असता आरोपींनी माझ्या आत्यास, तुला येथे घरकुल बांधू देणार नाही, तु येथे कशी राहते तेच पाहतो असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबाबत मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. आता मला माझ्या फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी तो माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता व तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे व आरोपींना शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**निशाणी ३२**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. डी. पोखरकर यांच्या मार्फत</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.12 16:58:54 +0530

दिनांक १२.०१.२०२६ **( अनंत रा. टेंगसे )**
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.